## न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांचे न्यायालय, कामठी

सं.फौ.ख.क्र.: ११७३/१७
सरकार/ रंजित वगैरे **नि.:**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारिख | : | २२/१०/२०१७ |
| २. | तक्रारीच्या अहवालाची तारिख | : | २२/१०/२०१७ |
| ३. | तक्रारकर्त्याचे नाव | : | शासनातर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>नविन कामठी. |
| ४. | आरोपीचे नाव व पत्ता | : | |

१. रंजित उद्धव जांभुळकर
वय ३८ वर्षे, व्यव.: मजुरी,
राह.: जरीपटका, नागपुर

३. सुरेंद्र धनराज कांबळे,
वय ४९ वर्षे, व्यव.: मजुरी,
राह.: राणी दुर्गावती चौक नागपुर

४ हरिष गणेश गजभिये,
वय: ३५ वर्षे, व्यव.: मजुरी,
राह.: बिनाकी ले-आउट,
मंगळवारी नागपुर.

५. बबलु अब्दुल शेख,
वय: ४४ वर्षे, व्यव.: मजुरी,
राह.: राणी दुर्गावती चौक नागपुर

६. अनिल गोपीचंद खोब्रागडे,
वय: ४२ वर्षे, व्यव.: मजुरी,
राह.: राणी दुर्गावती चौक नागपुर

७. पुरुषोत्तम विठठल चापले,
वय: ६२ वर्षे, व्यव.: मजुरी,
राह.: राणी दुर्गावती चौक नागपुर

५ गुन्हयाचा तपशिल,

की, तुम्ही आरोपी क्र. २ सह दि. २२/१०/२०१७ रोजी १६.३० ते १६. ५५ वाजेदरम्यान अजनी शिवारात, मेश्राम यांच्या शेतात असणा-या फार्म हाउसच्या समोरिल मोकडया जागेवर कामठी, तह.-कामठी, जिल्हा-नागपुर येथे सार्वजनिक ठिकाणी पैशाची बाजी लावुन ५२ तासपत्त्यावर हारजितचा जुगार खेळतांना मिळुन आलात आणि याद्वारे तुम्ही महाराष्ट्र जुगारबंदी कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा केला.

कामठी
दिनांक: २४/०९/२०१८

(श्रीमती एस. ए. पाटील)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, कामठी

**कबुली** :

| | | |
|---|---|---|
| प्रश्न १ | :- | तुम्हाला पोलीस दस्तांच्या प्रती मिळाल्यात काय ? |
| उत्तर | :- | होय. |
| प्रश्न २ | :- | गुन्हयाचा तपशिल आता तुम्हाला वाचुन दाखविला व समजावुन सांगितला, तो तुम्ही ऐकला व तो तुम्हाला समजला काय ? |
| उत्तर | :- | होय. |
| प्रश्न ३ | :- | तुम्ही आरोप कबुल करित आहेत काय ? |
| उत्तर | :- | मला आरोप कबुल आहेत. |

१. ................... ५. ...................

३. ................... ६. ...................

४. .................... ७. ...................

आरोपींची सही
दि. २४/०९/२०१८

(श्रीमती एस. ए. पाटील)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कामठी

.

## कारणेमिमांसा

आज आरोपी स्वत: न्यायालयात हजर झालेत. त्यांनी न्यायालयासमक्ष त्याच्यावर लावण्यात आलेले आरोप कबुल करुन त्याबाबतचा अर्ज अभिलेखात दाखल केला. त्याआधारे त्यांना गुन्हयाचा तपशिल वाचुन दाखविण्यात आला असता त्यांनी सदर गुन्हयाचा तपशिल बरोबर असल्याचे मान्य करुन त्यांना आरोप कबुल असल्याचे न्यायालयासमक्ष कबुली दिली. पुढे त्यांनी न्यायालयासमक्ष त्यांची परिस्थिती हलाखीची असुन ते घरचे कर्ता पुरुष असल्याने त्यांचेविरुद्ध कमीत कमी द्रव्य दंड लादण्यात यावा अशी विनंती केली. आरोपींविरुद्ध लावण्या आलेल्या गुन्हयाचे स्वरुप व गांभिर्य पाहता त्यास द्रव्य दंड भरुन सोडुन देणे उचित ठरेल. म्हणुन मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी रंजित उद्धव जांभुळकर, सुरेंद्र धनराज कांबळे, हरिष गणेश गजभिये, बबलु अब्दुल शेख, अनिल गोपीचंद खोब्रागडे, पुरुषोत्तम विठठल चापले यास फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५२ अंतर्गत महाराष्ट्र जुगारबंदी कायदयाचे कलम १२(अ)प्रमाणे प्रमाणे दोषी ठरविण्यात येत आहे.

आरोपीविरुद्ध मुंबई जुगारबंदी कायदयाचे कलम १२(अ)च्या शिक्षेपोटी प्रत्येकी रोख रक्कम रु. ३००/- दंड व कोर्ट उठेपर्यत शिक्षा ठोठावण्यात येते. सदरहु दंड न भरल्यास आरोपींनी एक दिवसाचा साधा कारावास भोगावा.

२. सदर गुन्हयात जप्त मुद्देमाल उर्वरित आरोपी क्र. २ धिरज खापर्डे च्या संपरिक्षेकरिता राखुन ठेवण्यात यावा.

कामठी
दिनांक: २४/०९/२०१८

(श्रीमती एस.ए.पाटील)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कामठी.